# आर्किऑप्टेरिक्स : असली की नकली?

## (वैज्ञानिक जगतातील एक रहस्यमय वास्तव कथा)

डॉ. जयंत नारळीकर

१८५९ मध्ये चार्ल्स डार्विन याने 'ओरिजिन ऑफ द स्पीशीज' (जीव प्रकाराची उत्पत्ती) ह्या आपल्या पुस्तकात जीवशास्त्रातला उत्क्रांती सिद्धांत प्रसिद्ध केला. सृष्टीत जीवांचे जे वेगळे प्रकार दिसतात ते मुळात तसे नव्हते तर कालांतराने बदलत बदलत आजच्या स्वरूपात आले असा या सिद्धांताचा आशय होता. या बदलत्या क्रमात मानव हा माकडापासून आला असे मानले जाते.

डार्विनच्या सिद्धांतामुळे पाश्चात्य जगात मोठीच खळबळ माजली. विशेष करून धार्मिक प्रवृत्तीच्या लोकांना डार्विनच्या विधानामुळे मोठाच धक्का बसला. मानव हा सर्वश्रेष्ठ जीव देवाने आपले प्रतिबिंब म्हणून तयार केला असा ज्यांचा धार्मिक विश्वास होता त्यांना मानवाचे पूर्वज माकड होते हे नक्कीच पटण्याजोगे नव्हते. धर्ममार्तण्डांनी उत्क्रांतीवादाचा कडाडून विरोध केला. जून १८६० मध्ये ब्रिटिश असोसिएशनच्या ऑक्स्फर्डमध्ये भरलेल्या परिसंवादात बिशप सॅम्युअल विल्बरफोर्स यांनी या सिद्धांतावर चांगलेच ताशेरे ओढले. तेव्हां डार्विनच्या बाजूने टी. एच. हक्स्ले याने त्यांच्याशी वाद घातला. त्वेषाच्या भरात शास्त्रीय पातळी सोडून धर्मगुरूंनी जेव्हा विचारले, "तुम्ही माकडाला आपले पूर्वज मानता तर ते आईच्या बाजूने का वडिलांच्या ?" तेव्हा हक्स्लेनी उत्तर दिले, "अशासारखे असंबद्ध मुद्दे मांडणाऱ्या मानवापेक्षा माकड हेच पूर्वज म्हणून परवडले !"

"वादे वादे जायते तत्त्व बोधः" या उक्तीप्रमाणे अशा अनेक वादांतून तावून सलाखून डार्विनचा उत्क्रांती सिद्धांत अखेर मान्यता पावला. त्यामागे असलेल्या डार्विनच्या वैज्ञानिक मीमांसेचे महत्त्व लोकांना हळूहळू पटले. त्याने आपल्या तर्कांना पाठबळ म्हणून मोठ्या कष्टाने मिळवलेले पुरावे आणि त्याच्या सिद्धांतानंतर पुढे आलेले आणखी पुरावे यांच्यामुळे हा सिद्धांत आज जगन्मान्य झालेला आहे.

परंतु न्यायालयात दाखल केलेल्या पुराव्याप्रमाणेच वैज्ञानिक पुरावे देखील कित्येकदा सदोष निघतात. काहीतर चक्क बनावट असतात. डार्विनच्या सिद्धांताचा पाठपुरावा करणारा एक बनावट पुरावा 'पिल्टडाउन मॅन' या नावाने आज कुप्रसिद्ध आहे. माकडापासून मानव झाला हे मानले आणि हा बदल अचानक न घडता क्रमाक्रमाने घडत गेला असे गृहीत धरले तर माकड आणि आजचा मानव या दरम्यान मानवाचे पूर्वीचे स्वरूप अस्तित्वात असावे अशा स्वरूपाचे एक अवशेषात्मक अस्थिपंजर इंग्लंडमध्ये ससेक्स येथे पिल्टाडाउन भागात उत्खननात सापडले होते. १९०८ ते १९१५ च्या दरम्यान मिळालेल्या या अवशेषात माणूस आणि माकड दोघांशी साम्य होते. त्यातील डोक्याच्या आकारावरून त्यातील मेंदू बराच मोठा असावा असे वाटत होते. ही माणसापूर्वीची अवस्था कशी असावी यासंबंधी बरेच तर्ककुतर्क झाले.

परंतु १९५३ मध्ये प्राध्यापक क्लार्क, डॉ. वायरन व डॉ. ओकले यांनी 'पिल्टडाउन मॅन'चा अवशेष बनावट असल्याचे सिद्ध केले. त्यातील दात घासून घासून लहान केलेले होते, डोके नंतरच्या काळातल्या ओरंग ओटॅन माकडाचे होते, काही भागावर रंग दिलेला होता, इत्यादी पुराव्यानिशी या अवशेषाची तोतयेगिरी सिद्ध झाली.

एखादा सबळ मानलेला पुरावा बनावट ठरला तर मूळ वैज्ञानिक सिद्धांत एकदम त्याज्य ठरत नाही, पण विश्वास थोडा फार कमी होतोच. त्यामुळे एखादा सबळ मानला गेलेला पुरावा बनावट असल्याचा दावा जर कोणी केला तर अर्थातच मूळ सिद्धांताचे समर्थक तो दावा खोटा आहे असे दाखवू पाहतात.

असाच काहीचा प्रकार नुकताच "आर्कि ऑप्टेरिक्स" बाबतीत नुकताच घडला.

* * *

"आर्किऑप्टेरिक्स" हे नाव लंडनच्या ब्रिटिश म्युझियम ऑफ नॅचरल हिस्टरी येथे प्रामुख्याने दर्शवलेल्या एका जीवावशेषाला दिले आहे. हा अवशेष प्रामुख्याने दर्शवण्याचे कारण तो सरपटणारा प्राणी आणि पक्षी यांच्या दरम्यानच्या उत्क्रांतीशील जीवाचा आहे. १८६१ मध्ये जर्मनीतील बव्हेरिया येथील एका दगडाच्या खाणीत हा अवशेष सापडला. ज्या दगडात हा अवषेश सापडला तो सुमारे सोळा कोटी वर्षांपूर्वीच आहे. चुनखडकाची लादी मोडून तिच्यात हा अवशेष सापडला होता. त्याचा मुख्य भाग दगडाच्या एका बाजूला स्पष्ट उमटलेला आहे. ज्याप्रमाणे वहीत शाईने लिहिलेली अक्षरे. शाई वाळण्यापूर्वीच वही बंद केल्यास समोरच्या पानावर आपले ठसे उमटवतात, त्याचप्रमाणे आर्किऑप्टेरिक्सची अस्पष्ट खूण मूळ दगडाच्या दुसऱ्या भागावरही उमटलेली दिसते.



डावीकडे लादीच्या मध्यभागी जे काळसर ठिपके दिसतात, ते बनावटकारांनी वापरलेले (पंख चिकटविण्यासाठी) चुइंग गम आहे का ?
उजवीकडे आर्किऑप्टेरिक्सचे संपूर्ण चित्र. त्यात मुख्य लादी दिसत आहे.

आर्किऑप्टेरिक्स हा अवशेष प्रामुख्याने सरपटणाऱ्या जीवाचा असला तरी उत्क्रांती होते त्यावर पंखाच्या निस्संदिग्ध खुणा आहेत. सरपटणाऱ्यांची पक्ष्यात उत्क्रांती होते असा डार्विन आणि हक्सले यांचा दावा होता इतकेच नव्हे तर उत्क्रांती काळातील जीवाचे स्वरूप कसे असावे याचा तर्क म्हणून हक्सले यांनी जे चित्र रेखाटले होते त्या बरहुकूम हा अवशेष वाटतो. डार्विनच्या पुस्तकाच्या प्रकाशानानंतर लवकरच हा अवशेष उजेडात आला हे पण येथे नमूद केले पाहिजे.

अर्थातच उत्क्रांतीवादाचा उत्कृष्ट पुरावा म्हणून आर्किऑप्टेरिक्सला पुष्कळ महत्त्व देण्यात येते. परंतु हा पुरावा देखील बनावट स्वरूपाचा असण्याची शक्यता आज बोलली जाते. 'बनावटी'चा आरोप का केला जातो आणि त्यापासून बचावासाठी ब्रिटिश म्युझियमसारख्या सुप्रस्थापित संस्थेने कुठले धोरण अवलंबिले हा एक मनोरंजक किस्सा आहे आणि हा पुरावा जर खरोखर नकली असेल तर मुळात प्रामुख्याने ब्रिटिश म्युझियममध्ये तो आला कसा हा इतिहास देखील तितकाच मनोरंजक आहे. परंतु इतिहासाकडे वळण्यापूर्वी प्रथम वर्तमानातल्या वादाची माहिती करून घेऊ.

× × × × ×

ब्रिटिश म्युझियममधील आर्किऑप्टेरिक्स नकली आहे, अशा आशयाचे एक पत्र इस्राइल मधील एका शास्त्रज्ञाने इंग्लंडमधील प्रसिद्ध वैज्ञानिक सर फ्रेड हॉयल यांच्याकडे गेल्यावर्षी पाठवले. हॉयल आणि त्यांचे कार्डिफ येथील सहकारी प्राध्यापक चंद्र विक्रमसिंहा (मूळचे श्रीलंकेतील) यांनी गेली कित्येक वर्षे डार्विनच्या उत्क्रांतीवादाविरुद्ध मोहीम उघडली आहे. त्यांच्या मते डार्विनच्या सिद्धांतात पुष्कळ उणीवा आहेत. म्हणून साहजिकच त्या सिद्धांताला पोषक म्हणून पुढे केलेल्या पुराव्याकडे ते संशयाने पाहतात.

ऑर्किऑप्टेरिक्सची तपासणी करायला हॉयल आणि विक्रमसिंहा यांनी तज्ज्ञ छायाचित्रकारांची मदत घेतली. वेगवेगळ्या प्रकाशात अनेक बाजूंनी त्यांनी या अवशेषाची अत्याधुनिक तंत्राद्वारे छायाचित्रे घेतली, कारण अवशेष हाताळण्याला परवानगी नाही. या छायाचित्रांची बारकाईने तपासणी केल्यावर त्यांना काही संशयास्पद गोष्टी आढळून आल्या. त्यांची माहिती घेताना ज्या लादीवर हा अवशेष ठळकपणे उमटलाय तिला "मुख्यलादी" आणि तिच्यावर झाकणासारख्या ठेवलेल्या लादीला "उलटी लादी" म्हणू. उघडलेल्या वहीचे उदाहरण डोळ्यापुढे ठेवले तर मुख्य स्लॅबवरील ठसा आणि उलट्या स्लॅबवरील अस्पष्टसा ठसा समोरच्या पानांप्रमाणे आहेत.

मुख्य लादीवरील पिसाची खूण एका चुनखडकाच्या थरावर आहे आणि त्याची पातळी लादीच्या पृष्ठभागापासून जवळजवळ दोन मिलीमीटर खाली आलेली आहे. त्या समोरील उलट्या लादीवरील पातळी मात्र तेवढीच वर आलेली दिसत नाही.

ऑर्किऑप्टेरिक्सचा मुख्य पंखांचा भाग जिथे आहे तेथे पिसे असल्याची खूण आहे. परंतु बारकाईने पाहिले तर एखादे अक्षर छापताना जर छाप थोडा सरकला तर जसे दिसेल तसे पंखांचे छाप सरकल्याच्या खुणा आहेत.

शिवाय पंखांचे छाप ज्या पृष्ठभागावर आहेत तो आजूबाजूच्या भागापेक्षा पुष्कळ गुळगुळीत आहे. आजुबाजूचे भाग त्यामामाने फार खरखरीत आहेत. खरखरीत भागावर पिसाचा छाप उठून दिसला नसता.

गुळगुळीत आणि खरखरीत भागांची पाहणी करता हॉयल आणि त्यांच्या सहाध्यायाना आणखी एक संशयास्पद प्रकार आढळला. पंखाच्या भागावर काही मिलीमीटर पर्यंत पसरलेले डाग आहेत ज्यांचे स्वरूप चुइंग-गम सारखे दिसते. ज्या ठिकाणी असे ठिपके आहेत तिथे पृष्ठभाग वर आलेला दिसतो. केवळ सूक्ष्म छायाचित्रणामुळेच हे कळते. उलट्या लादीवर देखील असे ठिपके दिसतात. वही बंद केली की समोरासमोरची पाने चप्प बसतात तसा उलटी लादी मुख्य लादीवर ठेवली तर त्या चपखल बसायला पाहिजेत पण हे उभट चुइंग-गमसदृश ठिपके आड येतील. त्यामुळे हे ठिपके उत्खननातून आलेले नसून नंतरचे असावेत असे वाटते. त्यांचे काय प्रयोजन असावे ?

१९८३ मध्ये आर्किऑप्टेरिच्या उत्खननानंतर त्यावर आर. ओवेन नावाच्या शास्त्रज्ञाने रॉयल सोसायटीच्या नियतकालिकात एक सविस्तर लेख लिहिला. त्यातील अवशेषाच्या चित्राची आजच्या छायाचित्रांची तुलना करता दोन्हीत तफावत दिसून येते. याचा अर्थ १८६३ नंतर अवशेषात काही तरी ढवळाढवळ करण्यात आली. मूळ अवशेषातील काही भाग उकरून काढला असावा. यामागे काय हेतू असेल ?

या शंकाकुशंका आर्किऑप्टेरिक्सच्या प्रकरणाला शेरलॉक होम्स सारख्या गुप्त पोलिसाच्या पुढ्यात टाकतात. शेरलॉक होम्सने काय निदान केले असते ?

आर्किऑप्टेरिक्स हा एक अस्सल आणि सलग अवशेष नसून तो बनावट आहे अशा तऱ्हेचे लेख 'द ब्रिटिश जर्नल ऑफ फोटॉग्रफी' मध्ये हॉयल, विक्रमसिंहा, वॉटकिन्स, रॅबिलिझिरोव्ह आणि स्पेट्नर यांनी प्रसिद्ध करायला सुरवात केली तेव्हा ब्रिटिश म्युझियमचे अधिकारी गडबडून गेले कारण ब्रिटिश म्युझियमसारख्या प्रतिष्ठित ठिकाणी शतकाहून जास्त काळ सन्मानाने ठेवलेला पुराण अवशेष बनावट असावा ही गोष्ट धक्कादायक होती. अशा प्रख्यात जागेतल्या अनुभवी तज्ज्ञांची फसगत होऊ शकते ही कल्पना निश्चितच चिंताजनक होती.

हॉयल प्रभृतींचा दावा असा की आर्किआप्टेरिक्सची पंखे कोणीतरी वेगळी आणून चिकटवली आहेत आणि त्यासाठी वापरलेल्या डिंकाचे ठिपके चुइंगमप्रमाणे उठून दिसतात. त्यांच्या मते डिंक असलेल्या भागाचा एक ग्रॅमपेक्षाही लहान भाग जर त्यांना म्युझियमने उपलब्ध करून दिला तर त्याची रासायनिक तपासणी करून आपला दावा ते आणखी सबळपणे सिद्ध करू शकतील. हा तुकडा मुख्य लादीचा नसला तरी चालेल कारण त्यामुळे मुख्य अवशेषाला धक्का पोचत नव्हता.

हॉयल प्रभृतींना हवा असलेला भाग उलट्या लादीचा असून तेथे पिसाची चिन्हे चुइंगमवर उमटलेली खुद्द म्युझियमच्या तज्ज्ञांनाच पूर्वी अवगत नव्हती. त्यामुळे तो भाग तपासणीसाठी देणे म्युझियमच्या अधिकाऱ्यांना जमण्यासारखे होते व तसा तो उपलब्ध करून देण्याची तयारी त्यांनी एप्रिल, १९८५ मध्ये फोनवरून कळवली होती. या प्रकरणी ज्या नियतकालिकात हॉयल प्रभृतींचे लेख प्रसिद्ध होत होते त्याच्या संपादकांनी मध्यस्थी केली होती, आणि ब्रिटिश म्युझियमची संमती मिळाल्याचे ५ एप्रिलच्या अग्रलेखात जाहीर करून टाकले.

परंतु कुठे तरी माशी शिंकली. १ मे, १९८५ च्या पत्रात म्युझियमच्या डॉ. चॅरिग यांनी विक्रमसिंहा यांना लिहिलेल्या पत्रात स्पष्ट शब्दात परवानगी नाकारली. डॉ. चॅरिग म्हणतात - "म्युझियमच्या स्टाफ व्यतिरिक्त इतरांनी तपासणी करायला म्युझियमचे अधिकारी परवानगी देतील अशी शक्यता मी कधीच बोलून दाखवली नव्हतो---परंतु आता परिस्थिती अशी आहे की ज्यामुळे अवशेषाची थोडीसुद्धा दुखापत होईल अशी तपासणी करणे योग्य होणार नाही, या निर्णयाप्रत आम्ही येऊन पोचलो आहोत म्हणून तपासणी कोणी करायची हा प्रश्नच उद्भवत नाही."

म्हणजे हॉयल प्रभृतींना हवी तशी तपासणी करायची म्युझियमची तयारी नाही ! इतकेच नव्हे तर २३ मे च्या पत्रात डॉ. चॅरिग यांनी त्यांना तोंडी कळवले की त्यांच्या तज्ज्ञांनी अवशेषाची तपासणी करून तो असली आहे असे निदान केले असून म्युझियमच्या दृष्टीने हा वाद आता संपला आहे.

परंतु वाद हा एकतर्फी संपत नाही. ब्रिटिश म्युझियमच्या तज्ज्ञांनी तपासणी केली म्हणजे नेमके काय केले ? त्यासाठी निरीक्षक म्हणून हॉयल किंवा त्यांच्या एखाद्या सहकाऱ्याला का बोलावले नाही ? अशा गुप्ततेमागे काही काळेबेरे आहे का ?

आर्किऑप्टेरिक्स नकली आहे या विधानावरून काही वैज्ञानिकांनी हे निदर्शनास आणले आहे की अशा अवशेषाचे इतर नमुने पृथ्वीवर इतरत्र सापडले असून ब्रिटिश म्युझियमखेरीज दुसऱ्या पुराण-अवशेष संग्रहालयात आहेत. त्यापैकी दोन अलीकडे सापडले. जर बनावटीचा प्रकार असता तर तो त्या सर्वांना कसा लागू होईल ?

या मुद्याचे उत्तर हॉयल आणि विक्रमसिंहा असे देतात : ब्रिटिश म्युझियममधील अवशेष वगळता इतर सर्व अवशेषांत (- असे पाच नमुने सध्या उपलब्ध आहेत) पिसे आहेत हे मान्य करता येत नाही. त्यामुळे हे इतर नमुने अस्सल असले तरी त्यातून सरपटणारे व पक्षी यांच्या दरम्यानची अवस्था वादातीतपणे सिद्ध होत नाही.

गुन्ह्यामागचा हेतू गुन्हा कोणी केला हे ठरवण्यासाठी एक महत्त्वाचे साधन आहे इतकेच नव्हे, गुन्हा घडला की नाही हे ठरवायला देखील हेतूचा विचार करणे उपयोगी ठरते. आर्किऑप्टेरिक्स ब्रिटिश म्युझियमकडे कसा आला याची हकिगत त्या दृष्टीने उद्बोधक आहे.

बव्हेरियातील कार्ल हेबर्लाइन याने १८६१ मध्ये हा पुराण अवशेष ब्रिटिश म्युझियमला विकला. हेबर्लाइन हा पॅपेनहाइम जिल्ह्यात वैद्यकीय अधिकारी होता. त्याच जिल्ह्यातल्या सोल्नहोफेन खाणीत आर्किऑप्टेरिक्स सापडला. सुमारे १७०० सालापासून नकली पुराण अवशेष 'तयार' करण्यासाठी हा भाग कुप्रसिद्ध होता. खाणीतून मिळालेल्या अस्सल जीवावशेषात फेरफार करून नवे

(पान १६ पाहा)

# आर्किऑप्टेरिक्स

(पा १ वरून)

जीवावशेष ...ार करायचे आणि त्यांच्या वैचित्र्या... किंमत वाढवून ते जी...ज्ञांना संशोधनासाठी विकायचे हा ...ला धंदाच होता. परंतु जसजसा जीवशास्त्राचा विकास होत गेला तसतसे अस्सल आणि बनावट यांच्यातला फरक ओळखणे वैज्ञानिकांना जमू लागले. त्यामुळे बनावट अवशेष निर्माण करणाऱ्याना देखील आपली 'कला' अधिक 'प्रगत' करावी लागली. (-ज्या प्रमाणे बनावट नोटा करणाऱ्यांना आपले तंत्रज्ञान अधिक प्रगत करावे लागते!) केवळ ज्या बनावटीवर जीवशास्त्रज्ञ विश्वास ठेवू शकतील, अशीच अस्तित्वात आणणे त्यांच्या धंद्यास हितावह होते.

ह्यासंदर्भात हक्सले याने भाकित केलेल्या सरपटणारे व पक्षी यांच्या दरम्यानच्या जीवाला महत्त्व येते. त्याकाळी वादामुळे डार्विनचा सिद्धांत खूप गाजत असल्याने हक्सलेचे हे भाकित पॅपेनहाइम येथील बनावटकारांचा माहीत असणे अशक्य नाही व त्या भाकिताला साजेसा आर्किऑप्टेरिक्सचा अवशेष त्यांनी बनवण्याचे धाडस केले असल्यास आश्चर्य नाही.

ब्रिटिश म्युझियमतर्फे हा अवशेष विकत घेण्याचे काम रिचर्ड ओवेन यांनी केले. ते ब्रिटिश म्युझियमच्या निसर्गेतिहास विभागाचे प्रमुख असून पुढे म्युझियमचे संचालक झाले. त्यांनी हा अवशेष विकत घेताना दिलेली किंमत म्युझियमच्या वार्षिक अनुदानाच्या दुप्पट होती. परंतु अवशेषाचे महत्त्व ओळखून दुसऱ्या वर्षाच्या अनुदानाची रक्कम त्यांनी स्वतःच्या खिशातून भरायची तयारी दर्शवली. ह्यावरून कोणाचाही असा समज होणे साहजिक आहे की डार्विनच्या सिद्धांताचा पुरावा म्हणून ह्या अवशेषाचे महत्त्व ओवेन यांनी जाणले आणि कसे करून हा महत्त्वाचा पुरावा ब्रिटिश म्युझियमसाठी हस्तगत केला. परंतु गोम इथेच आहे.

रिचर्ड ओवेन हे डार्विनच्या सिद्धांताच्या कट्टर विरोधकांपैकी होते. डार्विनच्या पुस्तकाचे परीक्षण करताना त्यांनी इतके अनुदार उद्‌गार काढले होते की, डार्विनने त्यावर आक्षेप घेतला होता. त्याचप्रमाणे ऑक्स्फर्ड येथील ब्रिटिश असोसिएशनच्या परिसंवादात बिशप विल्बरफोर्सचे त्यांनी समर्थन केले होते. त्या वादात हक्स्लेने डार्विनच्या बाजूने प्रभावी मुद्दे मांडून बाजी मारली हे ओवेनना चांगलेच लागले असणार. अशा परिस्थितीत डार्विनच्या सिद्धांताला पोषक असा आर्किऑप्टेरिक्स येन केन प्रकारेण ब्रिटिश म्युझियमसाठी हस्तगत करायला ओवेन पुढे का सरसावले?

जर आर्किऑप्टेरिक्स हा अस्सल पुरावा असेल तर ओवेन यांची कृती अनाकलनीय वाटते. त्या उलट जर तो पुरावा बनावट आहे हे ओवेनना माहीत होते हे गृहीत धरले तर मात्र त्यांचा हेतू स्पष्ट होतो. प्रथम हा पुरावा म्युझियममध्ये प्रदर्शित करून डार्विनची मान्यता मिळवायची आणि डार्विनने तशी मान्यता दिल्यावर आणि त्या पुराव्यामुळे आपला सिद्धांत सिद्ध होतो असे जाहीर केल्यावर मग तो पुरावा बनावट असल्याचे उघडकीला आणायचे.

हा डार्विनकरता ओवेन यांनी रचलेला एक सापळा होता ह्या तर्काला आणखी एका कारणाने पुष्टी मिळते. आर्किऑप्टेरिक्सचे अवशेष दोन भागांतून काही महिन्यांच्या अंतराने हेबर्लाइनकडून लंडनला पाठवले गेले. ते बहुधा मुख्य लादी आणि उलटी लादी अशा भागात असावेत. मुख्य लादी मिळाल्यावर रॉयल सोसायटीत ओवेन यांनी त्या अवशेषाची माहिती देणारा प्रबंध वाचला. त्यामध्ये उलट्या लादीचा बिलकूल उल्लेख नाही! ओवेन यांची अशी अपेक्षा असावी की त्यांचा प्रबंध आणि मुख्य लादीचे प्रदर्शन पाहून डार्विन आणि त्याचे समर्थक आनंदाने उड्या मारून 'जितंमया' असे म्हणतील आणि तसे झाल्यावर उलटी लादी आणवून हे सर्व प्रकरण बनावट असल्याचे सिद्ध करावे. अशा मुळे जरी बनावट पुराव्याला आपण फसलो असे ओवेनला जाहीररीत्या कबूल करून निंदा पत्करावी लागली असती तरी त्याहीपेक्षा डार्विन व हक्सले यांची झालेली फजिती पाहून त्याला समाधान वाटले असते, इतकेच नव्हे तर त्या काळच्या डार्विन विरोधी वातावरणात ओवेनची लोकांनी प्रशंसाच केली असती.

परंतु हा डाव ओवेनवरच उलटला असावा कारण डार्विन आणि हक्सले दोघांनीही उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताकरता आर्किऑप्टेरिक्सला काहीही महत्त्व दिले नाही. डार्विन याने आपल्या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीत आर्किऑप्टेरिक्सचा उल्लेख जाता जाता एका ओळीत केला आहे, जर त्याला हा पुरावा सबळ वाटता तर त्याचा त्याने प्रामुख्याने उल्लेख केला असता. कारण स्वतःच्या सिद्धांताला पोषक असे मिळतील ते पुरावे डार्विनने आपल्या पुस्तकात एकत्र केले आहेत. हक्स्ले याने देखील याबद्दल मौन पाळले. उलट १८६८ मध्ये रॉयल सोसायटीत प्रसिद्ध केलेल्या प्रबंधात त्याने ओवेनच्या अज्ञानावर पुष्कळ टीका केली.

यावरून असे दिसते की खुद्द डार्विन आणि हक्सले दोघांनी आर्किऑप्टेरिक्स बनावट असल्याचे ओळखले होते आणि म्हणून ते ओवेनने रचलेल्या सापळ्यात सापडले नाहीत. ब्रिटिश जर्नल ऑफ फोटॉग्रफीमधील २१ जून १९८५ च्या अंकात हे तर्क उपस्थित करून हायेल, विक्रमसिंहा आणि वॉटकिन्स यांनी ब्रिटिश म्युझियमला जणू एक आव्हानच दिले आहे. ●●